लोकमत

# शिवप्रेरणा ज्योत पारगडकडे रवाना

## जयघोषांनी परिसर दुमदुमला : कुलगुरुंची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आग्रा येथे औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवले होते. अतिशय चाणाक्षपणे तेथून सुटका करून घेत राजगडावर ते सुखरूपपणे पोहोचले. त्या ऐतिहासिक घटनेला ३५५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने शिवभक्तांनी काढलेली शिवप्रेरणा ज्योत मंगळवारी येथील शिवाजी चौकातून चंदगड तालुक्यातील पारगडकडे रवाना झाली. यावेळी शिवरायांच्या जयघोषांनी सर्व परिसर दुमदुमला.



कोल्हापुरातील शिवाजी चौकातून शिवप्रेरणा ज्योत पारगडकडे रवाना झाली. यावेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, शिवसेनेचे नेते विजय देवणे, शिवशाहीर राजू राऊत, सन्मती मिरजे आदी उपस्थित होते.

शिवप्रेरणा ज्योत घेऊन आलेले शिवभक्त आग्राहून निघून सोमवारी कोल्हापुरात पोहोचले. मंगळवारी सकाळी त्यांचे शिवाजी चौकात स्वागत करण्यात आले. त्यानंतर ते पारगडला रवाना झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र -कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शिवसेनेचे नेते विजय देवणे, शिवशाहीर राजू राऊत, सन्मती मिरजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिवज्योत घेऊन आलेल्या शिवभक्तांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

01 SEP 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजने पटकावली 'मेघनाथ नागेशकर' ट्रॉफी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते प्राचार्य व्ही. एम. पाटील यांच्याकडे ट्रॉफी सुपूर्द

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागाची मानाची २०१९-२० ची 'क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी' न्यू कॉलेजने पाचव्यांदा पटकावली. ही ट्रॉफी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व क्रीडा प्रकारात मिळालेल्या गुणांच्या आधारे अव्वल येणाऱ्या महाविद्यालयाला ही ट्रॉफी दिली जाते. न्यू कॉलेज गेल्या पाच वर्षापासून हॉलीबॉल, कब्बडी, गोळाफेक, थाळीफेक, ॲथलेटिक्स अशा मैदानी खेळांमध्ये विद्यापीठ परिक्षेत्रात अव्वल आहे. क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफीसाठी १००० गुण असतात. न्यू कॉलेजला १००० पैकी ७७८ गुण मिळाले आहेत. त्यामुळे यंदाही या ट्रॉफीचे मानकरी न्यू कॉलेज ठरले आहे. या यशासाठी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांचे प्रोत्साहन तर जिमखाना विभागप्रमुख अमर सासने, सुरज झिटे, दत्तात्रय भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठात कुलगुरूंच्या हस्ते ट्रॉफी देवून कॉलेजचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, जिमखाना विभागप्रमुख अमर सासने उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागाची मानाची 'क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी' कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. ए. एम. शेख, प्रा. अमर सासने.**

लोकमत

# न्यू कॉलेजने पटकाविली नागेशकर ट्रॉफी'

## सलग पाचव्यांदा विजेतेपद : सर्वच क्रीडा प्रकारांमध्ये यश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील न्यू कॉलेजने शिवाजी विद्यापीठाची क्रीडा विभागाची शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील 'क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी' मिळविली. सलग पाचव्यांदा कॉलेजने या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांना सोमवारी ट्रॉफी प्रदान केली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी डॉ. व्ही. टी. पाटील उपस्थित होते. सर्व क्रीडाप्रकारांमध्ये मिळालेल्या



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठाची क्रीडा विभागाची 'क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी' कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांना प्रदान करण्यात आली.

गुणांच्या आधारे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या महाविद्यालयातून गुणानुक्रमे अव्वल येणाऱ्या महाविद्यालयास ट्रॉफी दिली जाते. न्यू कॉलेजला एक हजारपैकी ७७८ गुण प्राप्त झाले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या 'आयएसओ' मानांकनाला मिळाली मुदतवाढ

## एक वर्ष मुदत : आयएसओकडून ऑनलाईन पाहणी, चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्ड लायझेशन' (आय.एस.ओ.) या संस्थेने शिवाजी विद्यापीठाच्या 'आयएसओ-९००१:२०१५' मानांकनाच्या प्रमाणपत्राला मंगळवारी एक वर्षासाठी मुदतवाढ दिली.

विद्यापीठाला सन २०१९ मध्ये सर्वंकष शैक्षणिक गुणवत्तेसाठी 'आयएसओ' मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान केले. मानांकन देणाऱ्या संस्थेकडून यावर्षीच्या प्रमाणपत्रासाठी मंगळवारी विद्यापीठाची ऑनलाईन पाहणी केली. या संस्थेच्या त्रिसदस्यी समितीने विद्यापीठातील अर्थशास्त्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, ग्रंथालय शास्त्र या अधिविभागांसह प्रशासनातील वित्त, प्रशासन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, परीक्षा अशा सात विभागांची माहिती घेतली. तेथील अधिकारी, कर्मचारी समवेत चर्चा केली. पाहणीच्या समारोप वेळी या समितीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याशी संवाद साधला.

शैक्षणिक प्रशासन, अभ्यासक्रमांची रचना व निर्मिती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन प्रकल्प, शैक्षणिक उपयोजन व नव तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यांकन व मूल्यमापन, संबंधित घटकांशी सहसंबंध, परीक्षा विषयक कार्यपद्धती व सुधारणा, निकालाची प्रक्रिया, पदवी प्रदान प्रक्रिया आदींची सर्वंकष पाहणी झाली.

समितीने समाधानकारक शेरा नोंदवित विद्यापीठाच्या आयएसओ मानांकन प्रमाणपत्राला एक वर्षाची मुदतवाढ दिली असल्याची माहिती अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. एम.एस. देशमुख यांनी दिली.

### ४१,८५४ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

विद्यापीठाच्या सध्या उन्हाळी सत्रातील ऑनलाईन परीक्षा सुरू आहेत. त्यात मंगळवारी ४१,८५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम.ए., एम. एस्सी., बीसीए., एमसीए., एमएसडब्ल्यूआदी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. दि. १८ ऑगस्ट रोजी झालेल्या परीक्षांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणास्तव परीक्षा देता आली नाही. त्यांनी याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंद करावी, असे आवाहन परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले.

पुढारी

# डॉ. मेघा पानसरे, मिलिंद चंपानेरकर यांना 'जांभेकर' पुरस्कार जाहीर



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे दिला जाणारा पत्रकार-अनुवादक बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने उत्कृष्ट भाषांतरकाराला दरवर्षी पुरस्कार दिला जातो. कोरोनामुळे सन २०१९ व २०२० या वर्षासाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले नव्हते. कोरोनाचा कहर काहीसा कमी झाल्याने नुकतीच या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. २०१९ सालचा 'बाळशास्त्री जांभेकर भाषांतर पुरस्कार' डॉ. मेघा पानसरे यांनी भाषांतर केलेल्या 'सोविएत रशियन कथा' पुस्तकाला, तर २०२० सालचा पुरस्कार 'भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा' या पुस्तकाच्या भाषांतरासाठी मिलिंद चंपानेरकर यांना जाहीर करण्यात येत आहे.

'सोविएत रशियन कथा' या पुस्तकात सुमारे शंभर वर्षांच्या काळातील रशियन कथांची भाषांतरे केलेली आहेत. डॉ. मेघा पानसरे या रशियन भाषेच्या तीस वर्षे अभ्यासक आहेत आणि त्यांनी ही भाषांतरे थेट रशियनमधून केलेली आहेत. 'भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा' हा प्रफुल्ल बिडवई लिखित मूळ इंग्रजी ग्रंथ अतिशय साक्षेपाने आणि व्यासंगपूर्ण लिहिलेला असून, भारतातील डाव्या विचारांचा ऐतिहासिक आढावा आणि भविष्यातील आव्हानांचे वेधक सूचन यात केलेले आहे. या पुस्तकांची निवड प्रफुल्ल शिलेदार, प्रा. सुनंदा महाजन, प्रा. रणधीर शिंदे व डॉ. नितीन रिंढे यांच्या समितीने केली आहे.

पुढारी

# विद्यापीठ कौशल्य, उद्योजकता विकास केंद्रातर्फे व्याख्यानमालेचे आयोजन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, पाथसिडस् एज्युकेशन इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ सप्टेंबर रोजी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. पाथसिडस् एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संचालक सलिल राजगुरू हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ

# दारिद्र्य निर्मूलन हा सर्वंकष धोरणाचा अविभाज्य घटक हवा : डॉ. अलघ

कोल्हापूर, ता. ३१ : "दारिद्र्य निर्मूलन हा देशाच्या केवळ निवडणुकीचा नव्हे, तर सर्वसाधारण सर्वंकष धोरणाचा अविभाज्य घटक असायला हवा," असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. योगेंद्र अलघ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत तिसरे पुष्प गुंफले. 'भारतातील निवडक अर्थविषयक समस्या आणि त्यामागे कार्यरत सिद्धांत' असा व्याख्यानाचा विषय होता. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात उपस्थित होते.



डॉ. योगेंद्र अलघ

डॉ. अलघ म्हणाले, "देशाच्या सामाजिक-आर्थिक धोरणांचा हेतू हा सर्वंकष सुधारणा असतो. या सुधारणांमध्ये नागरिकांचे राहणीमान उंचावण्याच्या बाबीला प्राधान्य हवे. देशाच्या विकासामध्ये अनुसूचित जाती-जमातींमधील घटकांनाही बरोबरचे स्थान हवे. महिलांनाही विकास प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याचे प्रयत्न व्हावे. आदिवासी, दलित महिलांनाही या विकासात त्यांचा वाटा उचलण्याची संधी हवी."

ते पुढे म्हणाले, "दूरगामी संवर्धनशील विकासासाठी उद्योगांना कर सवलतींसह विविध सवलती देऊन उत्तेजन द्यायला हवे. सर्वच सुविधांचे सरसकट खासगीकरण करणे हे आर्थिक सुधारणांना मारक आहे. एअर इंडियाची विमानसेवा नसती तर काबूलमधून भारतीय नागरिकांना एअरलिफ्ट करण्याचा धोका कोणत्या खासगी कंपनीने पत्करला असता? परिपक्व देश खासगीकरणा बाबतीतला निर्णय शहाणपणाने घेतात. आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेसाठी आजच्या पिढीने त्यागाची तयारी ठेवायला हवी." अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी स्वागत केले; तर डॉ. थोरात यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला.

01 SEP 2021
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दारिद्र्य निर्मूलन देशाच्या सर्वंकष धोरणाचा अविभाज्य घटक

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, जवाहरलाल नेहरु विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. योगेंद्र अलघ यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाच्या सुधारणांमध्ये नागरिकांचे राहणीमान उंचावणे म्हणजेच दारिद्र्यामधील वाढती दरी कमी करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. देशाच्या विकासामध्ये अनुसूचित जाती–जमातींनाही बरोबरीचे स्थान प्राप्त व्हायला हवे. तसेच दारिद्र्य निर्मूलन हा देशाच्या केवळ निवडणुकीचा नव्हे, तर सर्वसाधारण सर्वंकष धोरणाचा अविभाज्य घटक असायला हवा, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, माजी केंद्रीय मंत्री व नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. योगेंद्र अलघ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'भारतातील निवडक अर्थविषयक समस्या आणि त्यामागे कार्यरत सिद्धांत' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. अलघ म्हणाले, देशाच्या लोकसंख्येमध्ये अर्धा हिस्सा असणाऱ्या सर्वच जातीधर्मातील महिलांनाही विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामावून घेतले पाहिजे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये लोकसंख्या, तंत्रज्ञान, सुधारणा अर्थातच व्यापारी स्पर्धात्मकता या सर्व घटकांचा सहभाग महत्त्वाचा घटक आहे. सर्वसमावेशक विकास धोरण आखताना पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनशीलतेला प्राधान्य दिले पाहिजे. दूरगामी संवर्धनशील विकास साधण्यासाठी उद्योगांना कर सवलतींसह विविध सवलती देऊन उत्तेजन द्यायला हवे. सर्वच सुविधांचे सरसकट खासगीकरण करणे हे आर्थिक सुधारणांना मारक आहे. खासगीकरणाचा निर्णय अत्यंत विचारपूर्वक घेण्याची गरज आहे. सुधारणा करीत असताना देशाच्या सुरक्षेचादेखील विचार केला पाहिजे. खात्रीशीर सुधारणा होण्यासाठी युवा पिढीने त्यागाची तयारी ठेवायला हवी, असेही डॉ. अलघ यांनी सांगितले.

यावेळी अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. यशवंतराव थोरात यांनी प्रमुख व्याख्यात्यांचा परिचय करून दिला.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेली उन्हाळी परीक्षा मंगळवारी सुरळीत पार पडली. ४३३९६ पैकी ४१८५४ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाइनिंग, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग अॅन्ड फॅशन को-ऑर्डीनिशन, बॅचलर ऑफ डिझाइनिंग, मास्टर ऑफ व्होकेशनल, बी. एस्सी., एम. एस्सी., नॅनो सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी, एम. ए., एम. एस्सी., मॅथस्., बी. सी. ए., एम. सी. ए., एम. एस. डब्ल्यू., एम. आर. एस., एम. पी. ए. म्युझिक, एम. जे., बी. व्होक आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.